क्र.साप्रवि/रवक्र/न.क्र.३४८ /

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९.*

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २७९ दिनांक ०८ / ०३ / २०१०

विषय : शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द पुरावे सादर झाल्यानंतरही कारवाई टाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत.

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.अहत-१६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ दि.०१.११.२००८.
२) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.अहत-१६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ दि.०३.०८.२००९

.....

मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली श्री.अण्णा हजारे यांच्या समवेत दि.१३.०८.२००८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोताद्वारे अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द भ्रष्टाचार/गैरव्यवहाराचे पुरावे मिळाल्यास अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भिय शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर दि.०१.११.२००८ आणि दि.०३.०८.२००९ च्या शासन परिपत्रकांच्या प्रती अवलोकनार्थ सोबत जोडल्या आहेत.

२. या अनुषंगाने महावितरण कंपनीमधील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकांचे काटेकोरपणे अवलोकन करावे व ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोताद्वारे भ्रष्टाचार/गैरव्यवहाराचे पुरावे मिळाल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द विनाविलंब शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. तसेच जे वरीष्ठ अधिकारी, कनिष्ठ अधिकारी/ कर्मचाऱ्याविरुध्दच्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करीत नाहीत अथवा टाळण्याचा प्रयत्न करतात अशी वस्तुस्थिती सिध्द झाल्यास अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुध्दही शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

३. सबब, सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी दि.०१.११.२००८ व दि.०३.०८.२००९ च्या संदर्भिय शासन परिपत्रकांचे अवलोकन करावे व त्या अनुषंगाने उपरोक्त दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत: वरीलप्रमाणे.

(सु.य.पाटील)
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रति,
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

*D:\O&M\Adm Cir.F.N.348.doc*

**माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोताद्वारे प्राप्त झालेले शासकीय अधिकाऱ्यांविरुध्दचे पुरावे सादर झाल्यास, त्वरित दंडात्मक कारवाई करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
शासन परिपत्रक क्र.अहत-१६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १ नोव्हेंबर, २००८

**शासन परिपत्रक :-**

माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोताद्वारे शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द भ्रष्टाचार / गैरव्यवहाराचे पुरावे मिळाल्यास अशा अधिकाऱ्यांविरुध्द प्रशासकीय सेवेतील त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारात त्वरित दंडात्मक कार्यवाही करावी, तसेच शासकीय कर्मचाऱ्यांची कार्यालयातील वेळेवरील उपस्थिती तपासण्यासाठी खात्रीलायक संगणकीय पध्दती निर्माण करणे हे मुद्दे मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली श्री.अण्णा हजारे यांच्या समवेत दि.१३ ऑगस्ट, २००८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत उपस्थित करण्यात आले होते. त्यासंबंधी मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

(अ) शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध कायद्यातील कलम १० (२), (३) प्रमाणे "शासकीय अधिकाऱ्याने / कर्मचाऱ्याने नेमून दिलेले काम व त्यांचेशी संबंधित असलेली कर्तव्ये पार पाडताना जाणुनबुजून किंवा हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले तर त्यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करता येते." अशा अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालात कर्तव्य पालनात केलेली कसूर नमूद करण्याच्या तरतूदीप्रमाणे वरीष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी . तसेच माहितीच्या अधिकाराखाली अथवा अन्यथा प्राप्त माहितीद्वारे शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्याविरुध्द भ्रष्टाचार अथवा गैरव्यवहाराचे पुरावे मिळाल्यास अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द प्रशासकीय सेवेतील त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने त्यांच्याविरुध्द विनाविलंब शिस्तभंगाची कारवाई करावी.

(ब) **प्रत्येक प्रशासकीय विभागाने जिल्हा हा घटक समजून त्या जिल्हयातील गट-अ /वरिष्ठतम गट-ब अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली दक्षता पथक गठीत करावे.** या पथकामार्फत त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारी निवारणाची व्यवस्था करावी व त्यासंबंधी पाठपुरावा करावा.

(क) वरीष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्यांविरुध्दच्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करीत नाहीत अथवा ती टाळण्याचा प्रयत्न करतात अशी वस्तुस्थिती आढळल्यास अशा वरीष्ठ अधिकाऱ्यांविरुध्द प्रशासकीय विभागांनी शिस्तभंगाची कारवाई करण्याचा विचार करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या WWW.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००८११०४१२३२५८००१ असा आहे.

आदेशानुसार,

(प्र.ल.पाठक)
उप सचिव

प्रति,

राज्यपालाचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधनसभा सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व प्रशासकीय कार्यालये
सामान्य प्रशासन विभागातील कार्यासने, निवडनस्ती

**<u>माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती अथवा इतर स्त्रोताद्वारे प्राप्त झालेले शासकीय अधिकाऱ्यांविरुध्दचे पुरावे सादर झाल्यास त्वरित दंडात्मक कारवाई करण्याबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
शासन परिपत्रक क्र.अहत-१६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: **३ ऑगस्ट, २००९**

वाचा :- शासन परिपत्रक क्र.अहत-१६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ, दि.१.११.२००८

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रक दि.१.११.२००८ रोजीच्या शासन परिपत्रकामधील परिच्छेद 'क' येथील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

(क) वरीष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्यांविरुध्दच्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करीत नाहीत अथवा ती टाळण्याचा प्रयत्न करतात अशी वस्तुस्थिती आढळल्यास अशा वरीष्ठ अधिकाऱ्यांविरुध्द <u>प्रशासकीय विभागांनी</u> शिस्तभंगाची कारवाई करण्याचा विचार करावा.

शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध कायदयातील कलम १० (२), (३) मधील तरतुदीपेक्षा सदर तरतुद सौम्य आहे. अश्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत. या संदर्भात पुर्नविचार करुन शासन परिपत्रक दि.१.११.२००८ मधील परि. (क) खालील प्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

(क) "वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्याविरुध्दच्या भ्रष्टाचार अथवा गैरव्यवहाराचे पुरावे मिळाल्यास अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द कार्यवाही करीत नाहीत अथवा ती टाळण्याचा प्रयत्न करतात अशी वस्तुस्थिती सिध्द झाल्यास अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुध्द प्रशासकीय विभागांनी शिस्तभंगाची कार्यवाही करावी."

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या WWW.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००९०८०३१४०८४९००१ असा आहे.

आदेशानुसार,

(प्र.ल.पाठक)
**उप सचिव**

प्रति,

राज्यपालाचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधनसभा सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व प्रशासकीय कार्यालये
[illegible]